**रे.मु.नं.१५७/२०१४**

## आदेश निशाणी क्र. ५८ वरील

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांना प्रतिदाव्यास कैफीयत दाखल करणेस झालेला उशीर माफ करुन मिळणेसाठी केला आहे.

२. वादी सांगतात प्रतीदावा ता.५.६.२०१७ रोजी दाखल केला आहे. त्यानंतर ९० दिवसात म्हणजे ता.५.९.२०१७ पर्यंत कैफीयत देणे जरुर होते. परंतु वादी पुणे येथे राहात असल्याने व त्यांची तब्बेत बरी नसल्याने त्यांना वयाचे मानाने प्रवास करणे शक्य नव्हते, या कारणावरुन वादींना प्रतीदाव्यास वेळेत कैफीयत दाखल करता आली नाही. कैफीयत दाखल करणेस एक महिना एक दिवस इतका उशीर झालेला आहे. दावा स्थावर मिळकती संबंधीचा असल्याने वादींची प्रतीदाव्यास कैफीयत घेवून प्रकरण गुणावगुणावर चालून निर्णय होणे न्यायाचे होणार आहे. तरी झालेला उशीर माफ होवून प्रतीदाव्यास कैफीयत सादर करणेसाठीचा हा अर्ज.

३. प्रतिवादी क्र.३ ब यांनी त्यांचे म्हणणे देवून अर्ज व त्यातील कारण नाकारले आहे. ते सांगतात केवळ दाव्याचे काम लांबविण्याच्या हेतुने प्रस्तुतचा अर्ज उशीराने दाखल केला आहे. या वादींना प्रतीदाव्यास कैफीयत दाखल करणेस चार महिन्यांचा विलंब झाला आहे. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेचा झाल्यास खर्चावर मंजूर करणेस या प्रतिवादींनी कळविले आहे.

४. वादी व प्रतिवादींचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा वाटप, पृथक कब्जा व जाहिरीकरणासाठी आहे. प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.३ ब यांनी ता.५.६.२०१७ रोजी कैफीयती सोबत प्रतीदावा दाखल करुन वाटपाची मागणी केली आहे हे दिसते. त्यानंतर पुरेसा अवधी देवूनही वादींनी प्रतीदाव्यास कैफीयत सादर केलेली नाही.

६. वादी अर्जात सांगतात, त्या पुणे येथे राहात असल्याने, तब्बेत बरी नसल्याने, वयाचे मानाने त्यांना प्रवास करणे शक्य नव्हते. वादपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये वादींचा पत्ता कातेवाडी ता.मोहोळ असे नमूद आहे. अर्जातील उशीराबाबतची कारणे विचारात घेता, त्या अनुषंगाने कागदपत्र वादींनी सादर केलेली नाहीत. परंतु कारणाचे पुष्ठयर्थ कागदपत्रे सादर केली नाहीत यावरुन वादींना प्रति दाव्यास कैफीयत देण्याची संधी नाकारणे उचित होणार नाही.

७. दाव्याचे व प्रतिदाव्याचे स्वरुप विचारात घेता वादींना संधी देणे उचित वाटते. वादींना संधी दिल्याने प्रकरणामध्ये गुणवत्तेवर निर्णय देणेकामी मदत होईल तसेच नैसर्गीक न्यायतत्वाचेही पालन होईल. उशीराचा कालावधी पाहता तो खर्चाच्या रकमेवर माफ होण्यासारखा आहे. त्यामुळे खर्चाची रक्कम वादींवर लादत आहे.

८. सबब वरील चर्चेचा विचार करता अंतीम न्यायाच्या दृष्टीने वादींचा अर्ज नि.५८ रु.३००/- च्या खर्चावर मंजूर करुन प्रतीदाव्यास त्यांची कैफीयत देण्याची परवानगी देत आहे. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.३ ब यांना देण्यात यावी.

( कु.एल.एच.जाधव )

दिनांक : १८/१२/२०१७ २रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, मोहोळ

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file Order /Judgment are same word to word, as per the original Order /Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | H.J.Mane, |
| Court | : | 2nd Civil Judge Jr. Division & J. M. F. C. Mohol. |
| Date | : | 18/12/2017 |
| Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 18/12/2017 |
| Judgment/order uploaded on | : | 19/12/2017 |